# परतीच्या वाटेवर

By स्मिता भांडारकर

आज १३ जानेवारी सकाळचे सात वाजताहेत. फ्लोरिडा तील प्रसन्न सकाळ. अगदी रोजचेच चित्र. सहज बाहेर नजर टाकली. मेरी आणि सेबास्तीअन निघालेत ऑफिस आणि डे केअर ला. बाजूची फ्रान्सीस कॉफ्फी चा मग घेउन एका लयीत टोक्क टोक्क करत बाहेर आली. समोरची आजी ब्रिस्क वॉक घेत होती. एमिली ला घेऊन तिचा बाबा फोन वर नेहमी प्रमाणे बोलत होता. रोजचीच सकाळ. खाली संजय मात्र कोणाशी तरी फोन वर बोलत होता. सकाळी सकाळी कोणाचा फोन असा विचार करत मी खाली आले. बोलण्या वरून काही कळत नव्हते. मी प्रश्नार्थक नजरेनी त्याच्या कडे पहिले तर माझ्या कडे न बघता हा सरळ डेन मध्ये निघून गेला. असेल काही तरी कामाचा फोन. मी पण आपल्या कामाला लागले. काही खास असलं तर सांगेल आपणहून. आज कणाद ला लायब्ररीत घेऊन जायचंच. त्याच्या आत सकाळचा ब्रेकफास्ट, लंच सगळं करायला हवं. मी माझ्या विचारात.
तेवढ्यात संजय फोनेवरचे बोलणे संपवून आला. त्याच्या चेहेऱ्यावर वेगळाच भाव. एकदम म्हणाला इंडिया तून फोन होता. एक जॉब ऑफर आहे. छान आहे. मला समजेच ना. तो आपल्या विचारात. कंपनी चांगली आहे, ऑफर हि सॉलिड आहे. इथल्याहून जास्त पैसे देणार आहेत. परत पोझिशन हि चांगली. फक्त मुंबईला मूव्ह व्हावं लागेल. माझे मन एकदम दहा वर्ष मागे गेले. असेच डिसेंबर जानेवारी चे दिवस. नवीन सेलफोन सुरु झाले होते. छान वातावरण होते. मल्टी न्याशनल कंपनीज आल्या होत्या. नोकरी छान होती. मानाची होती. सगळ्या सुखसोयी होत्या. कामाची नशा होती. आणि असाच अचानक संध्याकाळी फोन आला होता. ध्यानी मनी नसतांना US मधून फोनवरूनच इंटरव्यू झाला आणि ऑफर पण आली. आता काय करायचे? एका फोन ने सगळे संदर्भच बदलून टाकले. एकदम अप साईड डाऊन. त्या वेळी US ची क्रेझ होतीच पण आपण अगदीच जायला हवे असे न्हवते. उलट इथे स्वप्नात पाहतो त्या सगळ्या सुविधा मिळत होत्या. पुढेही खूपच वाव होता. उलट नव्या देशात जायचे, तिथे जुळवून घ्यायचे, इथले सगळे लोक इथे सोडून जाण्याचे दुक्ख हि होते. इथे बरे असे वाटत होते. पण संधी कश्याला सोडायची आणि आपण काही प्रयंत्न केले नाहीत, समोरून आपणहून कोणी बोलावतय तर का जायचे नाही? परत अमेरिका म्हणतात ती कशी असते त्याचे सूक्ष्म आकर्षण हि होतेच. इतके वाचले होते, इतरांकडून ऐकले, सिनेमात पाहिले होते ते एकदा प्रत्येक्षात पाहावे, आपण हि अनुभवावे असेही वाटत होते. जीवाची घालमेल होत होती. आपला देश, इथली माती, आपली माणस, हे छोटेसे जग सोडून खरच जावेसे वाटत नव्हते. इथले पाश बांधून ठेवत होते. आपल्या सारखीच दिसणारी, आपल्याच रंगाची, आपण जे खातो तेच खाणारी, आपणासारखीच विचार करणारी, आपली श्रद्धा स्थानेहि एकच असणारी मंडळी सोडून परक्या ठिकाणी जाण तेव्हा खूपच कठीण वाटलं होत. नाही जमले, नाही आवडले, तर परत यायचे. परतीची वाट तर बंद नाही ना? असा विचार केला होत. आपली प्रगती; अनुभव घेणे हेही महत्वाचे असा विचार करून छोटेसे घरकुल सोडायला तयार झालो होतो. पुढचे काही दिवस विसा आणि तयारीत गेले. लोकांचे सल्ले.. सगळी मजा होती. आणि एकदाचे अमेरिका ड्रीमल्यांड, ल्यांड ऑफ ओप्पोर्टुनिटी, मेल्टिंग पॉट जे काही म्हणतात तिथे येऊन पोचलो. सगळेच नवे आणि कल्पने पलीकडचे जग. खूप एकट वाटायचं. काहीच आवडत नव्हतं. सारखी घराची आठवण यायची. परत जाण्या करता नुसती तगमग व्हायची. पण हळू हळू इथे मित्र भेटले, त्यांनी खूप मदत केली. इथे आल्यावर खरी मैत्री, मदत करण म्हणजे काय हे कळले. नाहीतरी अनुभव घेतल्यावर शब्दांचे अर्थ कळतात, शब्दकोशात फक्त शब्दाला प्रतिशब्द दिले असतात. इथली सवय झाली आणि हे आयुष्य खूप सोपे आहे, जगायला मजा येणारे आहे. आज पर्यंत आपण किती दडपणाखाली होतो, लोक काय म्हणतील ह्या बागुलबुवाला भीत जगात होतो हे समजले. स्वच्छंद आपल्या मनासारखे जगणे, प्रत्येक क्षण

उपभोगत जगणे हे कळले. त्याच बरोबर, शिस्त पळत, दुसर्याची स्पेस त्याला देत जगण्याची कला पाहत होतो. मस्त अनुभव होत हा. कालमाना प्रमाणे सगळे टप्पे पार पाडले. आधी अपार्टमेंट, डोल्लरट्री जनरल मधून जमवलेले सामान, रुपयात प्रत्येकाची किंमत कनवर्ट करायची आणि रिकाम्या हाताने परत यायचे. मला आठवते मी सहा महिने कोथिंबीर घेऊ शकले नाही. ९० रु कोथिंबीर! बापरे! वांग्याला एग्ग्प्लांठ, आणि भेंडीला ओक्रा, सिलान्त्रो, बेलपेप्पर, असे म्हणायला शिकलो. किल्या, दिव्यांची बटण उलटी वाटेनाशी झाली. कारच्या डीकीला ट्रंक आणि पेट्रोलला ग्यास कधी म्हणायला लागलो हे कळलेच नाही. मॉलला सेल पाहून जाणं, विंटरला समर आणि समरला विंटरची खरेदी करायला लागलो. फुटबॉल आणि सॉकर मधला फरक कळायला लागला. वर्ल्डकप म्हणजे फक्त अमेरिका आणि कॅनडा हेही कळायला लागलं. ग्रीन कार्ड झाले, आई वडिलांची अमेरिकावारी झाली. वीकेंड लॉंग वीकेंड प्लान करण सुरु झालं. MBA झालं. स्वताच्या घरात राहायला गेलो. Lowes आणि होमडीपो च्या चकरा झाल्या. स्वत लॉन मो करून झालं. थोडीपर अमेरिका पाहून झ्हाली. इंडिया विझिटस झाल्या. इथून ब्याग्स भरून सामान सगळयांसाठी घेऊन जायचं आणि येताना लोणची, पापड, भाजण्या, मेतकुट, पीठ, देवाचा देव्हारा, छोटी भांडी घेऊन येवू लागलो. एकत्र जमलो कि भारतात किती मजा होती, आपल्याला कशी, म्हणजे ( गोर्यांपेक्षा) जास्त बुद्धी आहे पण संधी नाही. सरकार किती भ्रष्ट आहे, हि चर्चा सुरु झाली. म्हणजे भेटणारी लोकं तीच, बोलायचे विषयही तेच, मेनू हि तोच, फक्त वेन्यू म्हणजे भेटण्याची ठिकाणं वेगळी. सगळं कस रुटीन. नाविन्य काहीच नाही आणि मग सुरु झाला X+१ सिंड्रोम. परत जायचंच पण पुढच्यावर्षी. सिटीझनशिप हि झाली आणि वाटले आता परतीची वाट मोकळी झाली. आता परत भारतात जायला हरकत नाही. नाही जमले तर परत येऊ. एक वर्तुळ पूर्ण झाले. काय गम्मत आहे पण. आता इथले नागरिक तर भारतात परत जाण्याची तयारी, म्हणजे परत परक्याच देशात नाही?

अभावितपणे मी सगळ्या घरावर नजर टाकली. क्षणात मी त्रयस्थ झाले. हे सगळे माझे आहे आणि सोडून जायचे? बाहेर पाहिले. Backyard दिसत होते. आठदिवसा पूर्वी मोगरा लावला होता. त्याला दोन कळ्या पहिल्यांदाच फुटत होत्या. कृष्णतुळस वाऱ्यावर डुलत होती. कढीलिंबाला नवीन पाने फुटत होती. विड्याची पाने नागवेल भिंतीचा आधार घेऊन वर चढत होती. पेरलेली मेथी इवलाले कोंब घेऊन मातीतून वर येऊ पाहत होती. कोथिंबीरतर अजून मातीतच होती. माझी इवली बाग, त्यात अजून खूप करायचे होते. समोर landscape करायचे होते. परत घरभर नजर जात होती. कालच Bed Bath मधून कितीतरी दिवस ठरवत होते पण काय गरज आहे म्हणून कधि घेतले नाही असे काही शॉपिंग होते . आता जर इथे राहायचेच नाही तर हे तरी कशाला हवे असे वाटले. घरात अजून मना सारखे बरेच करायचे होते. पुढे करू म्हणून न केलेले ते आता? आमच्या घरा समोर एक लेन जाते तिथे काय असेल एकदा बघून येऊ म्हणता कधिच गेले नव्हते अशा किती तरी गोष्टी करायच्या होत्या आणि इथून जायची पण वेळ आली? माणसाचे असेच असते नाही? अजून जगायचे आहे, जगायचे आहे, म्हणता म्हणता जायचीच वेळ येते आणि जगायचेच राहून जाते.

मनाच्या free way वर विचारांची गाडी सुसाट वेगाने जात होती. भूत काळातून भविष्यकाळात, इथून भारतात, तिथून परत इथे. सगळे मनाचे खेळ. मनाची तयारी हवी बस बाकी सारे आपच होते. क्षणात आपलं वाटणारं परकं होतं तर परके आपले जीवाभावाचे होतात. विचारांची आवर्तन आणि प्रश्नांचे भोवरे. To be or not to be, करावे कि करू नये. कायमच झालेला अर्जुन, काय करावे ते कळत नाही, खूप confused . खरेच कृष्ण भेटावा आणि त्याने आपले कर्तव्य काय ह्याची जाणीव करून द्यावी. मनाची द्विधा अवस्था संपवावी. पण आपण कुठे एवढे भाग्यवान कि कृष्ण भेटेल. इथे तर आपणच अर्जुन आणि आपणच कृष्ण.

झालं त्या दिवसापासून मनात काहूर माजले. मनात द्वंद्व सुरु झाले. जावे म्हटले तर इथले सगळे सोडवत नाही. नाही म्हटले तर तिकडचे क्षितीज खुणावत होते. जे हातातून निसटतय असं वाटतं ते अजून घट्ट पकडून ठेवावेसे वाटते. तशीही निर्णय प्रक्रिया हि त्रासदायक, कष्टकारकाच असते. परिस्थितीने भाग पाडले तर निर्णय घेणे सोपे, पण ठरवून काही करायचे by choice खूप कठीण.

इतके दिवस जायचे जायचे म्हणत होतो आणि तिकडे जाणे किती सुखकारक असेल ह्याची इथे सगळ्या सुखसोयींमध्ये बसून कल्पना करत होतो तेव्हा छान वाटत होते. पण आता परत जाण्याचा मार्ग दिसतोय तर जाणे कठीण वाटतेय. हे म्हणजे भूकबळींचे, दारिद्र्याचे प्रश्न सोडविण्या करता एखादी conference five star hotel मध्ये भरविण्यासारखे आहे. खरच आपल्याला नेमक काय हवे आहे तेच समजेनासे झाले आहे. इथे आपण भारतात असताना घालावलेले दिवस आणि त्या आठवणीनंवर तासन तास बोलत असतो. रम्य ते दिवस, एवढ्या सोयी नव्हत्या, पण तरी आपण किती मजेत होतो, वगैरे वगैरे. पण खरच त्या वेळी आपण खुश होतो का? आपल्याला अजून काही हवे असे वाटत नव्हते का? मागे वळून पाहताना आता हे छान आहे जाणावते कारण त्यावेळचा स्ट्रेस, कटू आठवणी आपण विसरतो आणि फक्त चांगले तेवढे लक्षात ठेवतो. भूतकाळाचे गोडवे हे आता गाणे सोपे आहे. मग लक्षात आले कि आपल्याला भारतात अमेरिका हवी आहे आणि अमेरिकेत भारत. आणि which is mutually exclusive. हे असे होऊ शकत नाही. काहीतरी एकच मिळणार. दिवसेंदिवस संजयच्या office मधे पण all is not well हे जाणवत होते आणि समजत होते. तो खुश नाही हे समजल्यावर काय करायचे हा प्रश्न होताच. Florida सोडावे लागणारच म्हणजे पर्यायाने हे घर. इथले सगळेच. मग अजून कुठेतरी जायचे, तर परत भारतातच का नको? तिथली growing economy, खूप संधी आहेत, मित्रांशी बोलताना हे जाणवत होते.
शेवटी खूप पैसा, सुखसोई असल्या आणि कामाचे समाधान नसले तर? परत आपण आयुष्यात यशस्वी झालो म्हणजे काय? यशाची व्याख्या काय? खूप पैसा म्हणजे यश? मुलं लहान असे तो पर्यंत परत जाणे सोपे, नंतरचे प्रश्न, निर्माण होणाऱ्या समस्या, इतरांकडून समजत होते. अनुभव तर सगळेच सांगत होते चांगले वाईट. दरभेटीत भारतातून येताना मनात रुखरुख वाढत होती. आई वडिलांचे विचार मनात येत होते. ते दिवसेंदिवस थकत चाललेत. प्रत्येक वेळी गेलेकी जाणवायचे केस अजून रुपेरी झालेत. चाल कामाची गती जरा कमी झाली आहे, चेहेऱ्यावर रेषा जरा जास्तच वाटताहेत. नजरेतली चमकही कमी होत आहे. पाठीवर ठेवलेल्या हाताची सूक्ष्म थरथर जाणवायची. आपल्या मुलांच्या प्रगतीच्या आड कधीच येणार नाही हे माहिती असूनही जाणवायचे कि आता आपण त्यांच्या जवळ असलो, निदान हाकेच्या अंतरावर तर बरं. ते नातं सगळयात घट्ट. ज्यांना आपल्यामुळे आणि आपल्याला त्यांच्यामुळे खरा फरक पडेल. बाकी जगात कोट्यावधि लोक आहेत पण आपले जिवलग म्हणता येतील असे फक्त हाताच्या बोटांवर मोजण्या एवढे. त्यांच्यामुळे तर अजून परत जाण्याची ओढ नाही तर काय? ज्यावेळी त्यांना गरज आहे त्यावेळी आपण फक्त दुरून फोनवर बोलायचे कोरडे आणि पैसे पाठवून द्यायचे. पण मानसिक शारीरिक आधारासाठी तिकडे जायचे नाही. रात्री अपरात्री दचकून जाग यायची. कोणाकोणाचे अनुभव आठवायचे. तशीही घरी सगळयांना आपल्या शिवाय जगण्याची सवय झाली आहे. असे उलट सुलट विचार करता परत जायचेच हाही अनुभव घेऊन बघू इथे अमेरिकेत परत तर येता येईलच असे ठरवले. झाले! त्या दिवसापासून परत जाण्याची तयारी सुरु झाली. काय घेऊन जायचे, कसे करायचे, नुसती धावपळ. एकदा विचार पक्का झाला, निर्णय घेतला कि वाट मोकळी. सगळा मार्ग स्वच्छ दिसू लागला. घराची सोय लावणे आणि सगळं आवरून परत जाणे. इथेही सगळे मित्र आणि घर सोडून जाणे सोपे नव्हते. सगळयांनी केलेली मदत, मिळालेले प्रेम हे रक्ताच्या नात्या एवढेच पक्के आहे. माझ्या मैत्रिणींनी पुढाकार घेऊन दिलेली निरोप पार्टी तर विसरूच शकणार नाही. त्याक्षणी वाटले हा प्रेम जिव्हाळा भारतातपण मिळणार नाही, खरच जाऊ नये, इथेच रहावे. रिकामे घर, सगळ्या वस्तूंवर जडलेला जीव. कणादचे पहिले वर्ष इथेच गेले ह्या वास्तूत, त्याने पहिले टाकलेले पाऊल, पहिला उच्चारलेला शब्द, सगळं पहिलं ह्याच घरात गेले. त्या आठवणी म्हणजे अनमोल खजिना आहे. तो मनात ठेवत, मोकळ्या वास्तूवर भिरभिर नजर फिरवत, भरलेल्या डोळयांनी, पण तृप्त मनाने विमानात बसलो. परत प्रवास सुरु झाला अज्ञाताकडे.

विमान धावपट्टीवर धावू लागले आणि नजरेत जे जे भरून घेता येईल ते भरून घेत होते. उद्या हे असच असेल पण आपण मात्र नाही. विमान वर उडाले, खाली सगळे मुंगी सारखे दिसू लागले, आम्ही इथून

क्षणाक्षणाला दूर जाऊ लागलो. विमानात बसल्यावर फोन बंद करा असे सांगे पर्यंत केलेले फोन जातानाचे क्षण जणू मूठीत पकडून ठेवत होते. लंडनला मुंबईचे विमान ज्या टर्मिनलहून सुटते त्या टर्मिनल वर आलो. गेटवर साड्या, पंजाबीड्रेस दिसू लागले. बसण्याच्या सीटवर आणि जाण्याच्या रस्त्यात सामान ठेवलेले होते. कौंटरवर सगळे गर्दी करत होते. शिस्तीत, लाईन वगैरे काही नाही. सौजन्य दाखवणे नाही. वाटले भारताची सुरुवात झाली, आता ह्याची सवय करावी. दरवाजा कोणी उघडून ठेवणार नाही. आपल्याला त्रास नाही झाला म्हणजे झालं, दुसऱ्याच तो पाहून घेईल. खरच हि माणस परदेशात, विशेषतः गोर्यांशी कशी व्यवस्थित, शिस्तीत वागतात, पण आपण आपल्या लोकांशी का नाही असे वागू शकत? विमानातही युरोपपर्यंतचा प्रवासाचा दर्जा वेगळा असतो. युरोप ते मुंबई स्टाफ ची वागणूक वेगळी असते. ह्यात प्रवाशांची पण चूक आहेच. तेही व्यवस्थित वागत नाही.

मुंबईलातर वेळेवर आलो पण नेहमीचे air traffic कुन्जेस्चनमुळे रनवे उपलब्ध नाही. तास भर वर घिरट्या घातल्यावर इंधन संपत आले म्हणून अहमदाबादला land झालोतर airline कडे आवश्यक कागदपत्र नाही म्हणून इंधन मिळेना असे करता ८ तासांनी मुंबईला परत आलो. तिथे मात्र अजिबात त्रास झाला नाही. भरपूर counters आणि सौजन्याने काम वागणारा कर्मचारी वर्ग. विमानतळ हि खूप स्वच्छ, सुंदर, आंतरराष्ट्रीय दर्ज्याचा. मोठी van घ्यायला आलीच होती. ५ स्टार मध्ये suite होता. मुंबई मात्र अजून बकाल वाटली. खूप गर्दी, खूप धूळ, ऊन हे काही नवीन नाही. पोलुशून पण. कणादला मात्र पण आपण इथे का आलो हे कळत नाही. हे घर माझे नाही, हि बेडरूम माझी नाही असे सारखे म्हणत होता. आता हळू हळू त्यालाही सवय करावी लागेल. मुंबई प्रचंड महाग वाटत होती. इथे पैशाला काही किंमतच नाही. ज्यावेळी भारत सोडला तो काळ आमच्यासाठी गोठला होता. फक्त भेटायला गेल्यावर ह्याची ह्याची कल्पना येत नाही, पण आता इथेच राहायचे म्हटल्यावर जाणवत होते. मी आता रुपये डॉलर मध्ये कनवर्ट करत होते. घरांच्या किमती, रोज लागणाऱ्या वस्तूंच्या किमती, प्रचंडच होत्या. लोकांना त्याचे काही वाटतच नव्हते, सगळे सवयीचे झाले होते.

गरीब अजून गरीब आणि श्रीमंत अजून श्रीमंत. सगळ्यांचे कपडे, रहाणीमान आणि आमचे कपडे पाहू असे वाटत होते कि आम्ही अमिरीकेतल्या खेड्यातून आलो आहोत. कारण ज्या वेळी खरेदी केली होती तेंव्हाची fashion आता बदलेली होती. सगळे एकदम trouser, jeans मध्ये. मी आपली आता भारतात आले म्हणून पंजाबी ड्रेस मध्ये. Branded वस्तूंची प्रचंड craze. सगळ्या भारताचेच अमेरिकीकरण झाले आहे. आपली अस्मिता आपला वेगळेपणा, भाषा, कोणालाच त्याचा अभिमान नाही. सगळे पश्चिमेचे अनुकरण. मराठी कोणी बोलणार नाही. ह्यावरून अजागळ दिसणारा, मुद्दाम मराठी बोलणारा, असा कोणी असला म्हणजे तो बाहेरच्या देशातून आलेला असे पटकन ओळखता येते. आणि तिकडे आम्ही आवर्जून मराठीपण जपतो. १५ दिवसातच आम्ही दिल्लीला आलो. हे अजूनच वेगळं प्रकरण. इथे खूप show सगळा बडेजाव. घरं मात्र मोठी मोठी, रस्तेही मुंबई पेक्षा लांब रुंद. पण शिस्त मात्र मुंबईची बरी असे वाटले. रहदारीचे कोणतेही नियम पाळायचे नाहीत. काही बोलायचे नाही. लोक एकदम भांडायलाच येणार. एकदम रांगडे. गुरगाव तर एकदम mall city आम्ही तिथेच रहाणार होतो. घरं मात्र मस्त आहेत. ३-४ बेडरूम servant quarter अशी. नोकरांचे खूपच प्रस्थ दिसले. इथे कोणाच्याहि घरी गेले तर घराचे यजमान जयमानीण दार उघडणार नाही. नोकर दार उघडणार, घरातली बाई १५ मिनिटांनी येणार फुल्ल मेकप मध्ये. म्हणजे एकता कपूरच्या सीरिअल सारखे हे लोक मेकप करूनच झोपतात कि काय हे माहित नाही. घरात २४ तासाची एक बाई, वेगळा cook, साफसफाई करायला अजून एक. मुलं, घर, सगळं नोकरांच्या भरवश्यावर. घरातली बाई मग काय करते माहित नाही. मला अजिबात नोकरांची सवय नाही. सगळे आपणच करायचे. उलट घरात कोणी तिसरे असले कि त्याची अडचण होते. कोणीतरी सारखे आपल्यावर नजर ठेवून आहे असे वाटते. इथे नोकरांनी केलेल्या चोऱ्या, खून, अपहरण, ह्या बातम्या सारख्या पेपरला येतात. इथला युवावर्ग पहिला कि वाटते अमेरिका पेक्षा काही वेगळा नाही. व्यसनं, पैसा, मजा करणाच्या पद्धती, कल्पना, pub सगळे आहे. अर्थात काहीतरी मिळण्यासाठी धडपडणारा, सगळ्या वाईट सवयींपासून दूर राहणारा, आयुष्यात निश्चितध्येय असणारा पण आहे.

पैसेवाल्यांची मुलं हा स्वतंत्र विषय आहे पण पण हे सगळे लोण आता मध्यमवर्गातही आलेले आहेत. आणि सगळे ते मान्य करतांनाहि दिसतात. शाळा मात्र मला आवडल्या. सगळया प्रकारचे courses चालतात. अगदी Motessori, IB programs वगैरे. पैसे मात्र भरपूर.

आपल्या सणांबरोबर दुसरेही सण साजरे होतात. अजून एक जाणवले कि अमेरिकेत चिऊ काऊ करत मोठे झालेलो आपण इथले wheels on the bus म्हणत मोठ्या होणाऱ्या मुलांशी काही relate करू शकत नव्हतो. आधी आपल्याला ते माहिती करून घेऊ लागत होते. तसे इथे नाही. आपलीच संस्कृती, त्यामुळे मुलांना असे का प्रश्न खूप पडताना दिसत नाही. आपण घरात एक बाहेर वेगळे आहोत असे जाणवत नाही. शाळेतही दिवाळी बरोबर ईद साजरी होते आणि जन्माष्टमी बरोबर halloween. डब्यात मुल चं पोळी भाजी, पराठा इडली असे काही नेऊ शकतात. त्यांना कोणी तू yucky फूड आणले, हातानी खातो आहेस असे म्हणत नाही. शाळेत शिस्त, manners हि चं शिकवतात. अभ्यासाव्यतिरिक्त व्यक्ती विक्रासाठी हॉर्स रायडींग, डान्स, म्युसिक, योगा असे सगळे असते.

कणादला गणपतीत एकदम खूप टेम्परेचर आले आणि रात्री दोन वाजता त्याने डोळेच फिरवले, मान टाकली. बापरे! आमच्या पाया खालची जमीन सरकली. बरे ते बरे वेळ रात्रीची होती. संजय घरी होता आणि रस्त्यावर अजिबात गर्दी नाही. इथे इतका traffic jam असतो कि असे वाटतं अशी काही वेळ आलीतर माणूस उपचाराशिवाय रस्त्यावर मरेलच. घराजवळ अगदी २ मिनिटावर सुस्सज आधुनिक हॉस्पिटल आहे. आम्ही जसे होतो तसेच तिथे गेलो तर १५ मिनिटं emergencyत डॉक्टरच नाही. खूप आरडा ओरडा केल्यावर एक डॉक्टर जो उडिपीच्या हॉटेल मध्ये चहा करणारा वाटेल असा आला. मी तर भान सोडून ओरडत होते ९११ ला फोन करा. अशी तिथली सवय झाली होती. नंतर मात्र अगदी छान योग्य उपचार झाले. एकमात्र झाले. ज्यासाठी इथे आलो ते म्हणजे आपले लोक, कुटूंब आणि जॉब satisfaction ते मात्र इथे आहे. कणादची कुटुंबाची व्याख्या बदलली आहे. आजी, आजोबा, आत्या, मावशी, मामा, सगळी भावंड म्हणजे त्याचे कुटूंब. एखादी प्राणी lizard जरी दिसला तरी तो म्हणतो कि त्याच्या घरी आजी आबा आत्या आहे का?. म्हणजे कुत्र्याला, पालीला पण सगळे नातेवाईक असतात. सगळयांशी सारख्या भेटी होतात. आता त्याचे आजी आजोबा आहेत, ते mom’s parents नाहीत. नाही तर तो मोठा झालेला सगळयांना फोटोवरुनच कळला असता. आता त्यालाही इथल्या आठवणी पयार होतील. आजीच्या घराची, मामाच्या गावाची मजा कळेल. संजयला अमेरिकेत असताना racism चा त्रास झाला नव्हता. पण merger नंतर वागणूक चांगली मिळत नव्हती. स्वतःची क्षमता पूर्ण वापरली जात नाही. आपण भोग्या असूनही डावलले जातोय असे वाटत होते. ते आता वाटत नाही. मोठ्या ऑफिस मध्ये मोठी पोस्ट आणि मनासारखे काम. खूप मोठ्या मोठ्या लोकांशी त्याचा कामामुळे संबंध येतो. एक वेगळाच आत्मविश्वास, समाधान वाटते. कामाच्या वेळा मात्र अगदी सकाळी ८ ते रात्री १०. स्वतःचा वेळ कुटुंबाला वेळ सध्या देता येत नाही कारण अजून सगळे नवे आहे पण हळू हळू तेही जमेल. माझ्यासाठी आयुष्यात फार फरक नाही. तिथेही मी घरीच होते इथेही. थोडाफार फरक तर आहे. अमेरिकेत खूप मित्र आणि socially खूप active होतो. ते मात्र इथे नाही. त्याची खूप आठवण येते. मोठे कलाकार अगदी जवळून बघितले, त्यांच्याशी बोलण्याची संधी मिळाली, ते इथे नाही. इथे सगळेच मोठे, गर्दी कि आपण पोहचूच शकत नाही. अजून मित्र मंडळी जमली नाही. असे कुछ खट्टा कुछ मीठा प्रकार आहे. कोणाच्या मनात आम्ही तर म्हंटलच होतं अमेरिकेत काय ठेवलं आहे. आपलं देशाच बरा असाभाव आहे तर कुणी आम्ही परत इथे कंटाळून कधी जातो त्याची वाट पाहतात आहे. सध्यातरी आम्ही ये जाईल आणि जसे येईल त्याचा अनुभव घ्यायचा, खूप काही पुढचा विचार करायचा नाही असे ठरवले आहे.

अशी हि आमची कहाणी. यथाज्ञानेन मिलीत उपचार द्रई व्यःई आहे. आम्ही आमचे प्रश्न त्यांची शोधलेली उत्तर अशी आहेत. तुमची कोणाची उत्तर काही वेगळी असतील, कोणाला अजून काही वेगळं सुचलं असेल तर मला कळवाल?